## संक्षिप्त

### आरंभ महाविद्यालयात मोफत बस पास वितरण

**नाशिक :** नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाच्या नाशिक रोड येथील पुरुषोत्तम स्कूल आणि आरंभ महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने अहिल्याबाई होळकर मोफत बस पास योजनेतंर्गत वितरण करण्यात आले. आगार व्यवस्थापक दादाजी महाजन, वाहतूक नियंत्रक प्रमोद इप्पर, धनराज जाधव, प्राचार्य उमाकांत वाकलकर, उपप्राचार्य संगीता पवार, शिक्षक प्रतिनिधी प्रा. राजेंद्र शेळके, महाविद्यालयाचे बस पासप्रमुख प्रा. विलास सानप यांच्या हस्ते पासचे करण्यात आले. प्राचार्य वाकलकर यांनी, या उपक्रमाचे कौतुक केले. अनेक वर्षांपासून ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना महाविद्यालयात येण्यासाठी प्रवास खर्चाचा मोठा अडथळा येत होता. हे लक्षात घेऊन शासनाने सुरू केलेल्या अहिल्याबाई होळकर मोफत बस पास योजनेमुळे विद्यार्थिनींना मोठा दिलासा मिळाला आहे, असे त्यांनी सांगितले. उपप्राचार्या संगीता पवार यांनीही मनोगत व्यक्त केले.

### कवी संदीप जगताप यांचा आज कार्यक्रम

**पिंपळगाव बसवंत :** दिंडोरी तालुक्यातील चिंचखेड येथील प्रसिद्ध कवी व व्याख्याते संदीप जगताप यांचा 'कविता आणि बरंच काही' हा कवितांचा कार्यक्रम मुंबईतील मंत्रालय अधिकारी, कर्मचारी कल्याण मंच यांच्यावतीने मंत्रालयात उद्या, गुरुवारी होत आहे. शेतकऱ्यांसंदर्भातील कवितांची मांडणी जगताप करतात. 'आयुष्य करायचं असेल हिरवेगार तर पोरी शेतकरी पोराशी लग्न कर' या कवितेने सामाजिक वातावरण ढवळून काढले आहे. जगताप यांचा मोठा रसिकवर्ग आहे.

### कायदेविषयक मार्गदर्शन शिबीर

**मनमाड :** दिवाणी व फौजदारी न्यायालय आणि मनमाड वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने येथील छत्रे विद्यालयात कायदेविषयक मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले. मनमाड न्यायालयाचे न्यायाधीश हरीश परदेशी प्रमुख पाहुणे होते. ॲड. किशोर सोनवणे, सुधाकर मोरे, रमेश अग्रवाल यांनी बालकांवर होणारे अत्याचार, बलात्कार व इतर अन्याय तसेच बालमजुरी याबद्दल आणि त्यासाठी असलेले संरक्षणविषयक कायदे याविषयी विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांमध्ये जनजागृती निर्माण करण्याच्या हेतूने मार्गदर्शन केले. न्या. परदेशी यांनी विद्यार्थ्यांची कायदेविषयक जिज्ञासा जागृत केली. याप्रसंगी न्यायालयाचे एस. के. पाटील, निकम, भामरे आणि हवालदार मनिषा बिडगर तसेच मुख्याध्यापक प्रवीण व्यवहारे, उपमुख्याध्यापक संदीप देशपांडे, पर्यवेक्षिका संगिता पोतदार उपस्थित होते. सूत्रसंचालन पंकज पाखले यांनी केले.

### सिद्धार्थ मंचतर्फे कष्टकऱ्यांना छत्री वाटप

**नाशिक :** काठे गल्लीत सिद्धार्थ क्रीडा व सांस्कृतिक मंचच्या वतीने कष्टकरी कामगार महिलांना छत्री वाटप करण्यात आले. अध्यक्षस्थानी माजी न्यायाधीश अनिल वैद्य आणि प्रमुख पाहुणे म्हणून भद्रकाली पोलीस ठाण्याचे ज्येष्ठ निरीक्षक राकेश चौधरी, मनपा स्थायी समितीचे माजी सभापती संजय साबळे, काठे नाना उपस्थित होते. वैद्य यांनी सिद्धार्थ क्रीडा व सांस्कृतिक मंच भविष्यातही सामाजिक भावना लक्षात घेऊन समाजाप्रती अशीच सेवा देत राहतील, असा विश्वास व्यक्त केला. पोलीस निरीक्षक चौधरी यांनी कुटुंब व्यवस्थेत वृद्धांच्या होणाऱ्या दुरवस्थेविषयी खंत व्यक्त केली. कार्यक्रम यशस्वितेसाठी मंचचे मार्गदर्शक संदीप डोळस, कार्यकारी सदस्य विजेंद्र गायकवाड, चंद्रकांत बर्वे आदी प्रयत्नशील होते. कार्यक्रमास अध्यक्ष विजय अहिरे, उपाध्यक्ष दिलीप तेजाळे, कोषाध्यक्ष राजेंद्र भालेराव आदी उपस्थित होते.

# अनुदानावर विणकरांना यंत्रसामग्री

## अधिकारी समितीची लवकरच येवला भेट

**लोकसत्ता वृत्तविभाग**

**येवला :** केंद्र पुरस्कृत समग्र योजनेतून अनुदान तत्वावर विणकरांना यंत्रसामग्री उपलब्ध करून देण्याची सूचना रेशीम संचालनालय व वस्त्रोद्योग विभागाच्या प्रधान सचिव अंशु सिन्हा यांनी केली आहे. विणकरांचे इतरही प्रश्न सोडविले जातील. समस्यांची माहिती घेण्यासाठी लवकरच अधिकाऱ्यांची समिती येवल्याला भेट देणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

मंत्री छगन भुजबळ यांच्या आदेशाने अंशु सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली येवल्यातील हातमाग विणकरांच्या समस्यांविषयी मुंबई येथे मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. येवल्यातील हातमाग विणकर प्रतिनिधींनी बैठकीत विविध समस्या मांडल्या. बैठकीस रेशीम संचालनालय व वस्त्रोद्योग विभागाच्या प्रधान सचिव अंशु सिन्हा यांच्यासह उपसचिव श्रद्धा कचरेकर, अवर सचिव अलका जगताप, उपसंचालक डॉ. महेंद्र ढवळे, सहसंचालक हेमंत लाडगावकर, रेशीम विकास अधिकारी विठ्ठल फड, वस्त्रोद्योग आयुक्त (नागपूर) संजय दैने तसेच येवल्यातील विणकर हातमाग प्रतिनिधी, पैठणी कलाकारी संघटनेचे संचालक प्रवीण पहिलवान, दत्ता मुंगीकर, संजय विधाते उपस्थित होते.

### विणकरांच्या विविध मागणया



- येवल्यात होऊ घातलेल्या सिरिकल्चर पार्क प्रस्तावाला मान्यता द्यावी, पैठणी तयार करण्यासाठी रेशीम धागा बंगळुरु येथून तर जरी सुरतहून उपलब्ध होते. ते स्थानिक ठिकाणी उपलब्ध होण्यासाठी आधुनिक यंत्रसामग्री अनुदान तत्वावर उपलब्ध करावे.
- येवल्यातील विणकरांना नवीन हातमाग खरेदीसाठी अनुदान देण्यात यावे, एक लाख रुपयांपर्यंत खेळते भांडवल शुन्य टक्के व्याजदराने मिळावे, विशेष बाब म्हणून पैठणी हातमाग विणकर कुटुंबातील सदस्यांना १० लाख रुपयांचे वैद्यकीय विमा संरक्षण मिळावे, वयोवृद्ध पेन्शन योजना लागू होण्यासाठी गती द्यावी, राज्य शासनाच्या विणकर कार्ड धारकांना सर्वच योजनांचा लाभ मिळावा.
- हातमाग विणकर कलाकारांचे वर्षातून दोन वेळेस मोफत डोळे तपासणे शिबीर घेण्यात यावे, विणकरांना तीन किलो वॅटची सौरऊर्जा यंत्रणा ९० टक्के अनुदानावर मिळावी, येवल्यात कायमस्वरुपी शासनमान्य प्रशिक्षण केंद्र सुरु करावे, केंद्राच्या धर्तीवर रेशीम संचालनालयाने येवल्यात सवलतीच्या दराने रेशीम विक्री केंद्र सुरु करावे.
- पैठणी हातमाग विणकर कलाकारांना शासकीय योजनांची माहिती व्हावी आणि योजनांचा लाभ मिळावा म्हणून वस्त्रोद्योग व रेशीम संचालनालयाच्या अधिकाऱ्यांची आठवड्यातून दोन दिवस येवल्यासाठी नेमणूक करण्यात यावी, शासनस्तरावर येवला पैठणीची व्यापक प्रमाणात प्रसिद्धी करावी, पैठणी व्यवसायाला भौगोलिक उपदर्शन (जीआय) नामांकन मिळाले असल्याने शासनस्तरावर संरक्षण करण्यात यावे, अशा मागण्या केल्या.

# निर्धारित दराने बियाणे विक्रीचे विक्रेत्यांना आवाहन

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नाशिक :** जिल्ह्यात खरीप हंगामास सुरवात झाली असून शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात बियाणे खरेदी करण्यात येत आहे.

जिल्ह्यातील बियाणे विक्रेत्यांनी शेतकऱ्यांना निर्धारित केलेल्या दरापेक्षा जास्त दराने बियाण्याची विक्री करू नये, तसे आढळून आल्यास कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अभिमन्यू काशिद यांनी कळविले आहे.

शेतकऱ्यांनी बियाणे खरेदी करताना विक्रेत्याकडून पक्के देयक घ्यावे, त्याप्रमाणेच रक्कम द्यावी.

जे बियाणे विक्रेते निर्धारित किंमतीपेक्षा जास्त किमतीत बियाणे विक्री करीत असतील तसेच पक्के देयक देत नसतील त्यांची तक्रार कृषी अधिकारी कार्यालय , कृषी अधिकारी पंचायत समिती तसेच जिल्हास्तरावर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद नाशिक यांच्याकडे अथवा ७८२१० ३२४०८ या व्हॉट्सॲप क्रमांकावर करावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी काशिद यांनी केले आहे.



**फुलव पिसारा नाच...**

पावसाळा म्हणजे मोरांसाठी आनंदाचा उत्सव. पंचवटीतील मेरी परिसरात मोरांची संख्या अधिक आहे. त्यातही पिसारा फुलविणाऱ्या मोरांचे सौंदर्य अधिकच उठावदार (छायाचित्र : यतीश भानू)

# मारुती चितमपल्ली यांना पक्षीमित्रांची श्रद्धांजली

**नाशिक :** येथील पक्षीमित्र संघटनेच्या वतीने डिसुझा कॉलनीतील सभागृहात पक्षीमित्र मारूती चितमपल्ली यांना सभेतून श्रद्धांजली वाहण्यात आली.



सोलापूर साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविलेले, नाशिक येथे १९८५ मध्ये पार पडलेल्या सहाव्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाचे अध्यक्ष, वनाधिकारी म्हणून दीर्घकाळ नोकरी करुन तब्बल ६५ वर्षे जंगलात काढणारे अरण्यऋषी म्हणून परिचित मारुती चितमपल्ली यांचे सोलापूर येथे निधन झाले. त्यांना नाशिक येथील पक्षीमित्रांतर्फे श्रद्धांजली वाहण्यासाठी सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत नेचर क्लब ऑफ नाशिकचे अध्यक्ष प्रा.आनंद बोरा यांनी चितमपल्ली यांच्या स्मरणार्थ नेचर क्लब ऑफ नाशिकतर्फे दरवर्षी वन विभागातील वनमजूर. मार्गदर्शक आणि वन कर्मचारी यांना पर्यावरणमित्र पुरस्कार दिला जाणार असल्याची घोषणा केली. पक्षीमित्र डॉ. अनिल माळी यांनी चितमपल्ली यांच्या आठवणी सांगितल्या. अरण्यऋषींनी नाशिकमध्ये कोणते देशी वृक्ष लावावेत, याची यादीच तयार केली होती, असे सांगितले. अंजली जाखडी यांनी सूत्रसंचालन केले. पक्षीमित्र संघटनेचे अध्यक्ष मधुकर जगताप, किशोर चव्हाण, भगीरथ घोटेकर, लहू डफळे आदी उपस्थित होते.

# मुक्त विद्यापीठाचा ३० जूनला गुणवंत विद्यार्थी सोहळा

**नाशिक :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा ३६ वा वर्धापन दिन एक जुलै रोजी साजरा करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, प्र-कुलगुरू डॉ. जोगेन्द्रसिंह बिसेन यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण समारंभ ३० जून रोजी सकाळी साडेअकरा वाजता विद्यापीठात आयोजित करण्यात आला आहे.

पारितोषिक सोहळ्यासाठी विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांच्या मे २०२४ मध्ये झालेल्या उन्हाळी अंतिम परीक्षेतील आणि मार्च २०२४ मध्ये झालेल्या कृषी शिक्षणक्रमातील गुणवंत विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे अध्यक्षस्थानी राहणार आहेत. विद्यापीठातर्फे दरवर्षी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे, पंडिता रमाबाई, कै. भाऊसाहेब हिरे, डॉ. चिंतामणराव देशमुख, डॉ. पंजाबराव देशमुख, भीमाबाई आंबेडकर, वेणूताई चव्हाण, लक्ष्मीबाई पाटील, डॉ. बापूजी साळुंखे, शारदाबाई पवार, हेमलता फडके आणि डॉ. भालचंद्र फडके, मोहनलाल डागा, डॉ. एस. जी. महाजन, कै. शिवाजीराव सोनार, पद्मसुला, प्रा. के.वाय. सोनावणे, दादासाहेब पोतनीस, गोपाळराव पंडित, कविता मेहेंदळे, मुरलीधर वडनेरे, दादासाहेब रेगे या ज्येष्ठ - श्रेष्ठ व्यक्तींच्या नावाने गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके दिली जातात. प्रमाणपत्र व पुरस्कारनिहाय रकमेचा धनादेश असे या पारितोषिकांचे स्वरूप आहे. त्यात विविध विद्याशाखांच्या विविध शिक्षणक्रमांमधील एकूण ३६ पारितोषिक गुणवंत विद्यार्थ्यांना दिले जातील. गुणवंत विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असल्याची माहिती कुलसचिव दिलीप भरड आणि परीक्षा नियंत्रक भटूप्रसाद पाटील यांनी दिली आहे.

# 'सुवर्णरेखा' उपक्रमास नृत्य जुगलबंदीचा साज

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नाशिक :** येथील कीर्ती कला मंदिराच्या वतीने संस्थेच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त 'सुवर्णरेखा' उपक्रमात नृत्य जुगलबंदी झाली. श्रिया पांडे आणि मधुश्री वैद्य यांच्या जुगल कथक नृत्याने रसिकांची मने जिंकली. कार्यक्रमाची सुरुवात रचना विद्यालताचे माजी मुख्याध्यापक आणि महाराष्ट्र समाज सेवा संघाचे सचिव सुधाकर साळी यांच्या हस्ते झाली.



पंडित डॉ. अविराज तायडे यांच्या दुर्गा रागातील 'तुम रस कान्हा रे' या एकतालातील विलंबित ख्यालाने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. इंद्रायणी काठी आणि तीर्थ विठ्ठल या अभंगांच्या सादरीकरणाने संपूर्ण वातावरण विठ्ठलमय झाले. नितीन वारे (तबला), संस्कार जानोरकर (हार्मोनियम), दिगंबर सोनावणे (पखवाज) आणि अमित भालेराव (टाळ) अभंग यांची साथसंगत लाभली. उत्तरार्धात श्रिया पांडे आणि मधुश्री वैद्य यांचे जुगल कथक नृत्य झाले. धृपद गायिकीतील अडाणा रागातील 'शिव शिव शंकर आदी दे' वंदना प्रस्तुत केल्यानंतर तालपक्षात तेरा मात्रांचा रास ताल पेश झाला. पारंपरिक बंदिशी पेश करतानाची दोघींची सहज सुंदर लयकारी आणि पढंतवर असलेले प्रभुत्व रसिकांची दाद घेऊन गेले. ईश्वरी दसक्कर हिच्या आवाजाने आणि श्रिया-मधुश्रीच्या नृत्याने रसिकांना खिळवून ठेवले. सुजित काळे (तबला), ईश्वरी दसक्कर (हार्मोनियम-गायन), सुरश्री दसक्कर (गायन) यांची साथसंगत लाभली. तन्मयी चव्हाणके आणि याज्ञश्री दारवेकर या दोघींनी सूत्रसंचालन केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेच्या उपाध्यक्षा नीलम किर्लोस्कर यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. २३ जुलैला चारुदत्त आफळे यांचे कीर्तन आणि मानसी पवार - मृदुल कुलकर्णी यांचे जुगल कथक होणार आहे.

# कदम, पांडे, भुजबळ, आव्हाड मोर्फी बुद्धिबळ स्पर्धेत विजेते

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नाशिक :** वेदान्त कदम, कुश पांडे, प्रणव भुजबळ आणि श्रेयस आव्हाड यांनी येथील यशवंत व्यायामशाळेत मोर्फी चेस अकादमीच्या वतीने आयोजित मोर्फी बुद्धिबळ स्पर्धेतील विविध गटाचे विजेतेपद मिळविले.

स्पर्धेचे उद्घाटन यशवंत व्यायामशाळेचे अध्यक्ष दीपक पाटील यांच्या हस्ते झाले. १०, १३, १६ वर्षांआतील आणि खुल्या अशा चार गटांमध्ये एकूण ५८ खेळाडूंनी सहभाग घेतला. स्पर्धा स्विस लीग पद्धतीने खेळविण्यात आली.

गटवार विजेत्या खेळाडूंमध्ये १० वर्षांआतील गटात वेदांत कदम पाच गुणांसह विजेता, राज गोडसरे, यशराज डोळी आणि शाहू धोंगडे हे प्रत्येकी चार गुणांसह अनुक्रमे द्वितीय, तृतीय आणि चतुर्थ स्थानी राहिले. वेदश्री जोशी हिला 'सर्वोत्कृष्ट मुलगी खेळाडू' पुरस्कार देण्यात आला.





**नाशिक येथे आयोजित मोर्फी बुद्धिबळ स्पर्धेतील विजेत्यांसह कँडिडेट मास्टर विनोद भागवत**

१३ वर्षांआतील गटात कुश पांडेने सर्व सामने जिंकून पाच गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला. ईश्वरी नाईक आणि द्रिती लाड चार गुणांसह अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय स्थानी राहिले. आद्या कोठूळे हिला 'सर्वोत्कृष्ट मुलगी खेळाडू' म्हणून गौरविण्यात आले. १६ वर्षांआतील गटात प्रणव भुजबळने तीन गुणांसह विजेतेपद पटकावले.

निहार महाशब्दे आणि वैभव मिश्रा यांनी दोन गुणांसह अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक मिळवला. खुल्या गटात श्रेयस आव्हाडने ३.५ गुणांसह प्रथम, निशांत शिंदे आणि निशांत गायधनी यांनी प्रत्येकी तीन गुणांसह दुसरे व तिसरे स्थान मिळवले.

कशिश सानप हिला 'सर्वोत्कृष्ट मुलगी खेळाडू'' म्हणून विशेष पारितोषिक देण्यात आले.

स्पर्धा राष्ट्रीय सुवर्णपदक विजेते व कँडिडेट मास्टर विनोद भागवत यांच्या मार्गदर्शनाखाली, मुख्य पंच मयूर कस्तुरे यांच्या देखरेखीखाली पार पडली.


**भौतिक ताबा सूचना**

**ICICI Home Finance** नोंदणीकृत कार्यालय : आयसीआयसीआय बँक टॉवर्स, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
कॉर्पोरेट ऑफिस : आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, जेबी नगर, अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी पूर्व, मुंबई-४०० ०५९
शाखा कार्यालय : पहिला मजला, इंदिरा हाइट्स, प्रमोद महाजन गार्डनजवळ, डोंगरी वसतिगृहासमोर, जुना गंगापूर नाका, नाशिक-४२२ ००५

ज्याअर्थी,

निम्नस्वाक्षरीकार हे आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड यांचा अधिकृत अधिकारी असल्याने त्यांनी सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स २००२च्या नियम ३ सहवाचता निर्देशित कलम १३(१२) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली नमूद केलेल्या कर्जदारांना डिमाण्ड नोटीस जारी केल्या आहेत, ज्यात डिमाण्ड नोटीसमध्ये नमूद केलेली रक्कम नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परत करावी.

कर्जदार रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, कर्जदाराला आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी वरील निर्देशित नियमांच्या नियम ८ सहवाचता वरील निर्देशित कायद्याच्या कलम १३(४) अंतर्गत त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून खाली नमूद केलेल्या तारखांना येथे वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषतः कर्जदाराला आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे इशारा देण्यात येतो की, त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी संबंधित कोणताही व्यवहार हा आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड यांच्या शुल्काच्या विषयाधीन असेल.

सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी, उपलब्ध वेळेनुसार, निर्देशित कायद्याच्या कलम १३च्या उप-कलम (८)च्या तरतुदींकडे कर्जदाराचे लक्ष वेधण्यात येत आहे.

| अ. क्र. | कर्जदाराचे/ सह-कर्जदाराचे नाव/ कर्ज खाते क्रमांक | मालमत्तेचे वर्णन/ ताब्यात घेतल्याची तारीख | मागणी सूचनेची तारीख/ मागणी सूचनेतील रक्कम (रु.) | शाखेचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | वसंत चिंधा चव्हाण (कर्जदार), ज्योती वसंत चव्हाण (सह-कर्जदार), एलएचएनएएस००००१२८८७३१. | रेणुका रेसिडेन्सी एफ क्र. १५, स्टिल्ट ३रा मजला, दत्तात्रय नगर, अमृतधाम अ. क्र. २६० (पी) क्र. २३ हॉटेल कुणालसमोर, आग्रा रोड, नाशिक./ ताबा तारीख : २१.०६.२०२५ | २३.०५.२०२२ रु. १८,३९,२७७/- | नाशिक |

वर उल्लेख केलेल्या कर्जदारांना/ सह-कर्जदारांना/ जामीनदारांना रक्कम परत करण्यासाठी ३० दिवसांची नोटीस देण्यात येत आहे, अन्यथा गहाण ठेवलेल्या मालमत्ता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियम २००२च्या नियम ८ आणि ९ अंतर्गत तरतुदींनुसार सदर या सूचनेचे प्रकाशन झाल्यापासून ३० दिवसांच्या मुदतीनंतर विक्री करण्यात येतील.

दिनांक : २६ जून २०२५, ठिकाण : नाशिक
अधिकृत अधिकारी, आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड



**earc एन्कोअर ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी प्रायव्हेट लिमिटेड (''एन्कोअर एआरसी'')**
**एन्कोअर एआरसी कॉर्पोरेट कार्यालय पत्ता: ५वा मजला, प्लॉट नं. १३७, सेक्टर-४४, गुरुग्राम-१२२००२, हरयाणा.**

**१. वाचन इलेक्ट्रो सिंक्स (मालकी/ ऋणको)**
तिच्या मालकाद्वारा प्रतिनिधीत्व केलेले- श्री. दिनेश वसंतलाल दोशी, सी-२२, स्वस्तिक इंडस्ट्रियल इस्टेट, मिलन मॅरेज हॉलच्या मागे, फाटकजवळ, भाईंदर (पू.), ठाणे, महाराष्ट्र- ४०११०५, **येथे सुद्धा**: ७/सी, वेस्ट व्ह्यू, प्लॉट नं. ३०९, एस. व्ही. रोड, सांताक्रुझ (प.), मुंबई उपनगर, महाराष्ट्र- ४०००५४. **येथे सुद्धा**: १२० व १२१, शिर्डी नाशिक हायवेलगत, मौजे खोपडी खूर्द, दत्त मंदिराजवळ, माइलस्टोन नं. ४८, सिन्नर, नाशिक, महाराष्ट्र- ४२२१०३.
**२. दिनेश वसंतलाल दोशी (सह-ऋणको व गहाणकार)** - ए/२, तळमजला, जीवन तरंग बिल्डिंग, गरोडियानगर, घाटकोपर (पू.), व्हीटीसी-मुंबई, पी.ओ. राजावाडी, जि. कुर्ला, मुंबई उपनगर, महाराष्ट्र- ४०००७७. **येथे सुद्धा**: ७/सी, वेस्ट व्ह्यू, प्लॉट नं. ३०९, एस. व्ही. रोड, सांताक्रुझ (प.), मुंबई उपनगर, महाराष्ट्र- ४०००५४. **येथे सुद्धा**: १२० व १२१, शिर्डी नाशिक हायवेलगत, मौजे खोपडी खूर्द, दत्त मंदिराजवळ, माइलस्टोन नं. ४८, सिन्नर, नाशिक, महाराष्ट्र-४२२१०३.
**३. पूजा दिनेश दोशी (सह-ऋणको व गहाणकार)** - बी/५०४, गौरव ॲव्हेन्यू, जीसीसी रोडजवळ, हाथकेश मीरा रोड, मीरा-भाईंदर रोड, ठाणे, महाराष्ट्र- ४०११०७. **येथे सुद्धा**: १२० व १२१, शिर्डी नाशिक हायवेलगत, मौजे खोपडी खूर्द, दत्त मंदिराजवळ, माइलस्टोन नं. ४८, सिन्नर, नाशिक, महाराष्ट्र- ४२२१०३.

**प्रिय महोदय/ महोदया,**

**विषय: विक्रीकरिता सूचना- सरफेसी ॲक्ट, २००२ च्या सेक्शन १३(८) यासह वाचलेल्या सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ (''रुल्स'') च्या रुल ८(६) अंतर्गत मेसर्स वाचन इलेक्ट्रो सिंक्स (''ऋणको'') यांच्या सुरक्षित मत्तेच्या, जिचा सांकेतिक ताबा रुल्ससह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (''सरफेसी ॲक्ट'') च्या सेक्शन १३(४) अंतर्गत घेण्यात आला आहे.**

तुम्हास माहित आहेच की, सरफेसी ॲक्ट, २००२ च्या तरतुदींच्या अनुसार, ''एन्कोअर ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी प्रा. लि.''ने (''**एन्कोअर एआरसी**'') दिनांकित ३१.१२.२०२४ अभिहस्तांकन करारनाम्याद्वारे खालील अंतर्निहित सर्व प्रतिभूतींसमवेत ''आदित्य बिर्ला फायनान्स लिमिटेड''द्वारा (''**एबीएफएल**'') ऋणकोंकरिता मंजूर झालेले वित्तीय सहाय्य संपादन केले आहे.

''एन्कोअर एआरसी''द्वारा वित्तीय सहाय्याच्या संपादनापूर्वी, ''एबीएफएल''ने यात नमूद केल्यानुसार देणींची परतफेड करण्यास तुम्हास सल्ला देणारी दिनांकित ०६.१०.२०२२ सरफेसी ॲक्ट, २००२ च्या सेक्शन १३(२) अंतर्गत सूचना निर्गमित केली होती. सरफेसी ॲक्ट, २००२ च्या सेक्शन १३(२) अंतर्गत निर्गमित केलेल्या उक्त सूचनेच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्ही देणींचे प्रदान करण्यास असमर्थ ठरल्यामुळे आणि त्याकडे दुर्लक्ष केल्याने, ''एन्कोअर एआरसी''च्या प्राधिकृत अधिकारींनी १०.०२.२०२५ रोजी, याखाली वर्णिल्यानुसार, स्थावर सुरक्षित मत्तेचा सांकेतिक ताबा घेतला होता.

कृपया ही सूचना रुल्सच्या रुल ८(६) अंतर्गत ३० दिवसीय सूचनासुद्धा समजण्यात यावी. हा ''३० दिवसीय'' सूचना कालावधी संपताच, ''एन्कोअर एआरसी''चे प्राधिकृत अधिकारी रुल्सअंतर्गत तरतूद केल्यानुसार अन्य कोणत्याही प्रकारे किंवा जाहीर ई-लिलाव/ खासगी कराराद्वारा याखाली अधिक तपशीलवारपणे नमूद केल्यानुसार सुरक्षित मत्तेच्या विक्रीकरिता पावले उचलतील.

| लॉट नं. | सुरक्षित मत्तेचे वर्णन |
|---|---|
| १ | पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे- मालमत्ता असलेली १२० व १२१, शिर्डी नाशिक हायवेलगत, मौजे खोपडी खूर्द, दत्त मंदिराजवळ, माइलस्टोन नं. ४८, सिन्नर, नाशिक, महाराष्ट्र- ४२२१०३. **पुढीलप्रमाणे सीमारेषांकित व सीमित: उत्तरेच्या दिशेने**: गट नं. ११९/१२०, **दक्षिणेच्या दिशेने**: गट नं. ११३/१३३, **पूर्वेच्या दिशेने**: गट नं. ११८/१२२, **पश्चिमेच्या दिशेने**: गट नं. १२१/११९. |

जाहिर ई-लिलावाद्वारा विक्रीबाबत, विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटी समाविष्ट राखीव किंमत, इसारा रक्कम ठेव, इ. परिशिष्ट-IV ए मध्ये दिलेल्या फॉर्ममधील जाहिर ई-लिलाव विक्री सूचनेच्या प्रसिद्धीसमवेत एकाचवेळी, रुल्सच्या रुल ८(७) नुसार ''एन्कोअर एआरसी''ची वेबसाइट म्हणजेच **https://www.encorearc.com** व **https://sarfaesi.auctiontiger.net/EPROC/** यावरसुद्धा अपलोड करण्यात येणार आहे.

ऋणको/ गहाणकार/ हमीदारांचे लक्ष रकमेवरील पुढील व्याज, आकार व किंमत यासह एकत्रित **०१.११.२०२४ पासून, ३१.१०.२०२४ रोजीप्रमाणे थकित रक्कम रु.३,८१,३५,४६२/- (रुपये तीन कोटी एक्याऐंशी लाख पस्तीस हजार चारशे बासष्ट फक्त)** या संपूर्ण देणीच्या प्रदानाद्वारे सुरक्षित मत्तेच्या उपलब्ध वेळेत विमोचनासंबंधित, सरफेसी ॲक्टच्या सेक्शन १३ च्या सब-सेक्शन (८) च्या तरतुदींकडे वेधीत आहोत.

तद्नुसार सुरक्षित मत्तेच्या विमोचनाकरिता ऋणको/ गहाणकार/ हमीदारांना एक अंतिम संधी देण्यात येत आहे, त्यास असमर्थ ठरल्यास, ''एन्कोअर एआरसी'', **ईएआरसी-बँक-०३२-ट्रस्टचे विश्वस्त** म्हणून तिच्या क्षमतेत कार्यरत असलेली, रुल्सच्या अनुसार पूर्वोक्त सुरक्षित मत्तेच्या विक्रीसह प्रक्रिया सुरू करील.

**स्थळ:** नाशिक | **स्वाक्षरी/- (विरेंद्र घनवट) प्राधिकृत अधिकारी**
**दिनांक:** २६.०६.२०२५ | **एन्कोअर ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी प्रा. लि.**



फॉर्म नं. ३
[नियम-१३(१)(अ) पहा]

**कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (डीआरटी 3)**
१ला मजला, एमटीएनएल टेलिफोन एक्सचेंज बिल्डिंग, सेक्टर-३० ए, वाशी, नवी मुंबई-४००७०३

**प्रकरण क्र.: ओए/२०/२०२५**

कर्ज वसुली न्यायाधिकरण (प्रक्रिया) नियम, १९९३ च्या नियम ५ च्या उपनियम (२अ) सहवाचता कायद्याच्या कलम १९ च्या उपकलम (४) अंतर्गत समन्स.

**स्टेट बँक ऑफ इंडिया** ईएक्सएच. क्र.:- १२०७१
विरुद्ध
**मेसर्स जेएस डेअरी फार्म रहाणे**

प्रति,
(१) **मेसर्स जेएस डेअरी फार्म रहाणे**, मुलगी/पत्नी/मुलगा- जयश्री
फ्लॅट क्र. ४, अशोका प्रेसिडेन्सी, नवीन गंगापूर नाका, गंगापूर रोड, सावरकरनगर, नाशिक-४२२०१३, नाशिक, महाराष्ट्र - नाशिक, महाराष्ट्र

**समन्स**

ज्याअर्थी, दि. **१७/०१/२०२५** रोजी माननीय पीठासीन अधिकारी/निबंधक यांच्यासमोर **ओए/२०/२०२५** सूचीबद्ध करण्यात आले.

ज्याअर्थी सदर या माननीय न्यायाधिकरणाला तुमच्याविरुद्ध कायद्यांच्या कलम १९(४) अन्वये **रु. ६४३१२७३.२९/-** च्या कर्जाच्या वसुलीसाठी दाखल केलेल्या अर्जावर (ओए) समन्स/नोटीस जारी करण्यास आनंद होत आहे (कागदपत्रांच्या प्रतींसह अर्ज, इत्यादी, जोडलेले आहे).

कायद्याच्या कलम १९ च्या उप-कलम (४) यानुसार, तुम्हाला, प्रतिवादींना, खालीलप्रमाणे निर्देश दिले जातातः-

(१) समन्स बजावल्यानंतर तीस दिवसांच्या आत कारणे दाखवणे, ज्यासाठी प्रार्थना करण्यात आलेली मदत मंजूर केली जाऊ नये;
(२) मूळ अर्जाच्या अनुक्रमांक ३ए अंतर्गत अर्जदाराने निर्दिष्ट केलेल्या मालमत्ता आणि मालमत्तेव्यतिरिक्त इतर मालमत्ता किंवा मालमत्तेचे तपशील उघड करणे;
(३) तुम्हाला मूळ अर्जाच्या अनुक्रमांक ३ए अंतर्गत उघड केलेल्या सुरक्षित मालमत्ता किंवा अशा इतर मालमत्ता आणि मालमत्तांशी व्यवहार करण्यास किंवा त्यांची विल्हेवाट लावण्यास, मालमत्ता जप्त करण्याच्या अर्जाची सुनावणी आणि निकाल प्रलंबित होईपर्यंत प्रतिबंधित केले आहे;
(४) तुम्ही त्याच्या व्यवसायाच्या सामान्य प्रक्रियेशिवाय, ज्या मालमत्तेवर सिक्युरिटी इंटरेस्ट निर्माण केला जातो आणि/किंवा मूळ अर्जाच्या अनुक्रमांक ३ए अंतर्गत निर्दिष्ट किंवा उघड केलेल्या इतर मालमत्ता आणि मालमत्ता, न्यायाधिकरणाच्या पूर्व मंजुरीशिवाय विक्री, भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करू शकत नाही;
(५) व्यवसायाच्या सामान्य प्रक्रियेत सुरक्षित मालमत्ता किंवा इतर मालमत्ता आणि मालमत्तांच्या विक्रीतून मिळालेल्या विक्री रकमेचा हिशेब देण्यास तुम्ही जबाबदार असाल आणि अशा विक्री रकमेची रक्कम अशा मालमत्तांवर सिक्युरिटी इंटरेस्ट असलेल्या बँक किंवा वित्तीय संस्थांकडे असलेल्या खात्यात जमा करा.

तुम्हाला अर्जदाराला दिलेल्या प्रतीसह लेखी निवेदन दाखल करण्याचे आणि **दि. १६/०७/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता** रजिस्ट्रारसमोर हजर राहण्याचे निर्देश देण्यात येत आहेत, अन्यथा तुमच्या अनुपस्थितीत अर्जावर सुनावणी करून निर्णय घेतला जाईल.

सदर तारखेलाः **२३/०६/२०२५** रोजी न्यायाधिकरणाच्या शिक्क्यासह माझ्या हाती दिले.

शिक्का

**सही/-**
**समन्स जारी करण्यासाठी अधिकृत अधिकाऱ्याची स्वाक्षरी.**

**टीप: जे लागू नसेल ते काढून टाका.**



**pnb Housing Finance Limited** Ghar Ki Baat

**परिशिष्ट-IV-ए - स्थावर मालमत्तेची ई-लिलाव - जाहीर विक्री सूचना**
सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ८(६)च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव-विक्री सूचना
नोंदणीकृत कार्यालय : ९वा मजला, अंतरिक्ष भवन, २२ कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली-११० ००१ फोन्स : ०११-२३३५७१७१, २३३५७१७२, २३७०५४१४, वेबसाइट : www.pnbhousing.com
**शाखा कार्यालय : ४०७ व ४०८, ४था मजला, पद्मा विश्व लॅण्डमार्क, तनिष्क शोरूमजवळ, ॲक्सिस बँकेच्या वरती, राक्का कॉलनी, शरणपूर रोड, नाशिक-४२२ ००२.**

याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून रकाना नं. 'ए'मध्ये दर्शविलेल्या ऋणको व हमीदारांना सूचना देण्यात येते की, सुरक्षित धनकोकडे गहाण असलेल्या/ ताब्यात असलेल्या याखालील रकाना नं. 'डी'मध्ये वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा विधायक/ प्रत्यक्ष ताबा (रकाना नं. 'सी'मध्ये वर्णिल्यानुसार) **मेसर्स पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड/** सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकारींद्वारा घेण्यात आला आहे, सदर स्थावर मालमत्तेची विक्री याखाली दिलेल्या तपशिलानुसार **''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे काही आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे''** या तत्त्वावर करण्यात येणार आहे.
ऋणको/ गहाणकार/ विधि वारसदार, विधि प्रतिनिधी (जे ज्ञात आहेत किंवा ज्ञात नाहीत), तारखेनुसार सुधारित केल्याप्रमाणे सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेन्ट रुल्स, २००२च्या रुल ८(६) व ९ अंतर्गत रकाना नं. 'ए'मध्ये दर्शविल्यानुसार, जसे असेल त्यानुसार, संबंधित ऋणको/ गहाणकारांचे (दिवंगत असल्यामुळे) निष्पादक, प्रशासक, उत्तराधिकारी, अभिहस्तांकिती यांना याद्वारा सूचना देण्यात आली आहे. विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता कृपया **मेसर्स पीएनबी हाउसिंग फायनान्स लिमिटेड/ सुरक्षित धनकोच्या www.pnbhousing.com या वेबसाइटवर तरतूद केलेली लिंक पाहावी.**

| लोन नं./ ऋणको/ सह-ऋणको/ हमीदार/ विधि वारसदाराचे नाव (ए) | मागणी केलेली रक्कम व तारीख (बी) | ताब्याचा स्वरूप (सी) | गहाण असलेल्या मालमत्तेचे वर्णन (डी) | राखीव किंमत (आरपी) (ई) | इरठे (आरपीची १०%) (एफ) | बोलीच्या सादरीकरणाची शेवटची तारीख (जी) | बोलीवृद्धी दर (एच) | पाहणीची तारीख व वेळ (आय) | लिलावाची तारीख व वेळ (जे) | ज्ञात भार/ न्यायालयीन प्रकरण, जर असल्यास (के) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एचओयू/एनएसके/०८१७/४१६६३१ आणि एनएचएल/एनएसके/१०१८/ ५८५३०९, धोंडिराम चिंतामण लोहकरे/ मनिषा धोंडिराम लोहकरे, शा.का. : नाशिक | रु. २५,०८,५९३.७४ व २३.०६.२०२१ | प्रत्यक्ष ताबा | फ्लॅट नं. बी १३, तळमजला, 'श्रीमंत होम्स', बिल्डिंग 'बी', सर्व्हे नं. ७९ २ए व ७९ ४ए, मातोश्री प्रेरणा लॉन्ससमोर, **साई पॅलेस हॉटेलच्या मागे, विजय नगर, मौजे भगूर, महाराष्ट्र-४२२ ५०२.** | रु. २१,०५,०००/- | रु. २,१०,५००/- | १४.०७.२०२५ | रु. १०,०००/- | ०३.०७.२०२५ रोजी दु. १२.०० ते दु. ०४.०० | १५.०७.२०२५ रोजी दु. ०२.०० ते दु. ०३.०० | *काही नाहीत/ ज्ञात नाही |

***त्याकरिता वसुली आणि/ किंवा प्रदानाच्या तारखेपर्यंत निघालेले लागू असल्याप्रमाणे १८% प्र.व. दराने पुढील व्याज, आनुषंगिक खर्च, किंमत, आकार इ.सह एकत्रित. **पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या प्राधिकृत अधिकारींना असलेले उत्तम ज्ञान व माहितीनुसार रकाना क्र. 'के'मध्ये जे काही प्रकट केले आहे ते वगळता वर नमूद केलेल्या स्थावर/ सुरक्षित मत्तेवर तेथे कोणतेही भार/ दावे नाहीत. याअधिक, सदर भार यशस्वी खरेदीदार/ बोलीदाराद्वारा, त्याच्या/ तिच्याकडील, सोसावयाचे आहेत/ प्रदान करावयाचे आहेत. भावी खरेदीदार/ बोलीदारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी स्थावर मालमत्तेवरील नमूद केलेल्या भाराची स्वतंत्ररीत्या पडताळणी करून निश्चित करावेत.**
**(१.)** आजच्या तारखेनुसार, तेथे वरील स्थावर मालमत्ता/ सुरक्षित मत्तेची विक्री करणे, अभिहस्तांतरण आणि/ किंवा वासलात लावणे यापासून 'पीएनबीएचएफएल'ला/ 'पीएनबीएचएफएल'च्या प्राधिकृत अधिकारींना प्रतिबंध करण्यास कोणताही आदेश आणि/ किंवा निषेधाज्ञा आलेली नाही. **(२.)** भावी खरेदीदार/ बोलीदार आणि स्वारस्य असलेले पक्षकार रकाना नं. 'के'मध्ये नमूद केलेल्या व मंजूर केलेल्या प्रक्रिया/ आदेश इ., जर असल्यास, त्यामधील याचिकांबाबत तपासणी स्वतः स्वतंत्रपणे करू शकतील. समाविष्ट परंतु त्याकरिता 'पीएनबीएचएफएल'कडे उपलब्ध असलेल्या संबंधित नामाधिकाराच्या कागदपत्रांचे नामाधिकार मर्यादित नाहीत आणि निविदा/ बोली अर्ज प्रपत्र किंवा प्रस्ताव सादर करण्यापूर्वी सर्व बाबतीत स्वतःचे समाधान करून घ्यावे. बोलीदाराने बोली प्रपत्रासमवेत या लिलावाच्या शर्ती व अटी स्वाक्षरीकृत करून घ्यावयाच्या आहेत. **(३.)** कृपया नोंद घ्यावी की, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ९(३)नुसार, बोलीदार/ खरेदीदाराने त्याच दिवशी किंवा उशिरात उशिरा कामाच्या पुढील दिवशी विक्री किमतीच्या (इसारा रक्कम समाविष्ट, जर भरलेली असल्यास) २५% ठेव, कायदेशीररीत्या बांधील असलेली, भरावयाची आहे. विक्री सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ९(२)नुसार सुरक्षित धनकोद्वारा विक्री किमतीच्या २५% रकमेच्या स्वीकृतीनंतरच केवळ बोलीदाराच्या नावे निश्चित करण्यात येईल. विक्री विचाराधीन उर्वरित रकमेच्या ७५% विक्री निश्चितीकरण पत्राच्या अभिस्वीकृतीच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत खरेदीदाराद्वारा भरावयाची आहे आणि सदर ठेव भरण्यात कसूर झाल्यास, प्राधिकृत अधिकारी विक्री निश्चितीकरण पत्रात नमूद केलेल्या १५ दिवसांचा अनिवार्य कालावधी संपण्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत विक्री निश्चितीकरण रकमेचा भागशः प्रदान जप्त करतील आणि मालमत्ता/ सुरक्षित मत्ता सरफेसी ॲक्टच्या तरतुदींनुसार पुन्हा विक्रीकरिता ठेवण्यात येईल. **(४.) सी१ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ई-लिलावाद्वारा विक्रीच्या आयोजनात प्राधिकृत अधिकारीस साहाय्य करणार आहे. तिचे कॉर्पोरेट कार्यालय येथे असलेले- प्लॉट नं. ६८, तिसरा मजला, सेक्टर ४४, गुरगाव, हरयाणा-१२२ ००३ वेबसाइट- www.bankeauctions.com बोली कागदपत्रे प्राप्त करणे किंवा मालमत्तेच्या पाहणीसंबंधित कोणत्याही साहाय्याकरिता आणि कोणत्याही अन्य शंकांकरिता किंवा नोंदणीकरिता तुम्हास श्री. गणेश अंकुश/ निलाक्षी पाटील, टोल-फ्री नं.: १८०० १२० ८८००, ई-मेल: auction@pnbhousing.com, जी 'पीएनबीएचएफएल'ची अधिकृत व्यक्ती आहे यांच्याशी समन्वय साधावयाचा आहे किंवा www.pnbhousing.com या वेबसाइटला भेट द्यावी.**

**स्थळ : नाशिक, दिनांकित : २५.०६.२०२५** | **स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**